महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३५२ वा

दिनांक : ०६/१२/२०२५ वार : शनिवार

## देवाभाऊंच्या सल्ल्याने इतर पक्ष चालतात : मंगलप्रभात लोढा



**बुलढाणा :** भाजप देवाभाऊमय आहे, तर महाराष्ट्रातील इतर पक्ष कसे चालतील हे देवाभाऊ ठरवतात, असे विधान मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले होते. त्यांच्या या वक्तव्यावर शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी आक्षेप घेतला आहे. मंगलप्रभात लोढा यांचे हे वैयक्तिक मत असू शकते. आमचा पक्ष उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सल्ल्याने चालतो. आमच्या पक्षाचा अजेंडा वेगळा असल्याचे गायकवाड यांनी म्हटले आहे. तसेच यावेळी बोलताना त्यांनी 2022 ची देखील आठवण करून दिली.

आमदार संजय गायकवाड म्हणाले, आमच्या पक्षाचा अजेंडा वेगळा आहे. आम्ही जी क्रांती केली त्यामुळे भाजप आणि महायुती सरकारमध्ये आहे. त्यामुळे मंगलप्रभात लोढा यांचे ते वैयक्तिक मत असू शकते. परंतु, आमचा पक्ष उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सल्ल्याने चालतो, असे गायकवाड यांनी स्पष्ट केले आहे. आता संजय गायकवाड यांच्या वक्तव्यावर लोढा काय प्रतिक्रिया देतात याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

मुंबई भाजपचा एक मेळावा शुक्रवारी मुंबईत पार पडला. त्यात बोलताना मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर स्तुतीसुमने उधळत वरील विधान केले. यावेळी त्यांनी मुंबईत भाजपला महापौर झाल्यास आपली कॉलर टाईट होणार असल्याचाही दावा केला. मंत्री लोढा म्हणाले, आपण देवाभाऊंची वेगवेगळी रूपे पाहतोय. त्यांची 100 वेगवेगळी रूपे आहेत. त्यांनी मागील वर्षभरात अनेक कामे केली. ते नागपूरचे सर्वात तरुण महापौर झाले. भाजप देवाभाऊमय आहेच, पण महाराष्ट्रातील इतर पक्ष कसे चालतील हे देखील देवाभाऊच ठरवतात.

मी मागील 25 वर्षांपासून त्यांना पाहतोय. त्यांना राजकारण करण्याचे काम कधी आवडते तर कधी आवडत नाही. पण आपल्या कुटुंबातील सुखदुःखात ते लगेच तत्परतेने धावून येतात व अडीअडचणी सोडवण्याचा प्रयत्न करतात. आज 5 डिसेंबर रोजी त्यांच्या शपथविधीला 1 वर्ष पूर्ण झाले. त्यामुळे आम्ही 4 शहरांत एक सर्व्हे केला. लोकांना सरकारच्या कामगिरीविषयी काय वाटते? हा प्रश्न केला. त्यात 70 टक्के लोकांनी आपण सरकारच्या कामगिरीवर समाधानी असल्याचा फिडबॅक दिला, असेही लोढा म्हणाले.

## कुंभमेळ्यासाठी १८०० झाडांच्या तोडीवर संसदेत गदारोळ

**नाशिक :** २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला सुरुवात झाली असून त्यासाठी तपोवन परिसरातील प्रस्तावित साधूग्राम प्रकल्पासाठी १८०० झाडांची तोड होणार असल्याची माहिती समोर येताच संतापाची लाट उसळली आहे. साधु-महंतांच्या तात्पुरत्या निवासासाठी ११५० एकरांवर साधूग्राम उभारण्याचे नियोजन असून, त्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करावी लागणार आहे. या निर्णयाचा नागरिक, पर्यावरणप्रेमी, स्थानिक संघटना तसेच अनेक कलाकारांनी याला जोरदार विरोध केला आहे. त्यातच शिवसेना ठाकरे गटाचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी संसदेत हा मुद्दा उपस्थित केला आहे.

संसदेत बोलताना खासदार राजाभाऊ वाजे म्हणाले, नाशिकच्या तपोवन परिसरात साधूग्राम आणि कुंभमेळ्याच्या तयारीच्या नावाखाली सुमारे १८०० झाडे तोडण्याची चर्चा सुरू आहे. हा परिसर शहरसाठी महत्त्वाचा तर आहेच आणि महत्त्वाचे म्हणजे हा परिसर पक्षी आणि जैवविविधतेचे केंद्र आहे. नागरिक, पर्यावरण प्रेमी आणि विविध संस्थांनी या झाडे तोड विरोधात जोरदार आंदोलन सुरू केले असल्याची माहिती वाजे यांनी दिली.

पुढे बोलताना राजाभाऊ वाजे म्हणाले, नाशिकमध्ये साधूग्रामसाठी पर्यायी जागा उपलब्ध असतानाही वनराई असलेल्या पवित्र तपोवनाची निवड का करण्यात आली, याबाबत प्रशासनाकडून पारदर्शक प्रक्रिया दिसत नाही. स्थानिक प्रशासनाने घेतलेले निर्णय पारदर्शक नसून पर्यावरण परिणाम अहवाल, लोकांसोबत संवाद आणि तज्ज्ञांचे मत विचारात न घेता ही प्रक्रिया वेगाने पुढे नेली जात आहे. झाडे ही निसर्गाची फक्त सजावट नाही, तर भविष्यातील हवामान सुरक्षिततेची हमी आहे. त्यामुळे माझी केंद्र सरकारकडे स्पष्ट मागणी आहे की तपोवन परिसरातील सर्व वृक्ष तोड तात्काळ थांबवण्यासाठी केंद्र सरकारने तात्काळ हस्तक्षेप करून पर्यावरण व विकास यांचा तोल राखणारा पर्याय निवडावा, अशी मागणी वाजे यांनी केली आहे.

## देशभरात विमानसेवा विस्कळीत, हजारो प्रवाशांना मनस्ताप



**पुणे :** माजी आमदार आणि प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी यांनी केंद्र सरकारच्या नागरी विमान वाहतूक धोरणांवर गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या मते, केंद्र सरकारच्या घिसाडघाईच्या आणि पूर्वतयारीविना लागू केलेल्या धोरणांमुळे देशभरातील विमानसेवा कोलमडली आहे. यामुळे लाखो विमान प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे.

जोशी यांनी निदर्शनास आणून दिले की, इंडिगो विमानसेवा सलग दुसऱ्या दिवशी देशभरात विस्कळीत राहिली. यामुळे सुमारे ५५० हून अधिक विमान उड्डाणे रद्द झाली. पुणे आणि मुंबई विमानतळावर शेकडो प्रवासी अडकून पडले होते. अनेकांच्या नोकरीच्या मुलाखती हुकल्या, लग्नसमारंभात जाणे शक्य झाले नाही, तर काही जणांना गंभीर आजारी नातेवाईकांना भेटता आले नाही किंवा अंत्यदर्शनालाही पोहोचता आले नाही. ही परिस्थिती केंद्र सरकार आणि नागरी विमान वाहतूक मंत्रालयाचे धोरणात्मक अपयश स्पष्ट करते, असे जोशी म्हणाले.

या गोंधळाचे मुख्य कारण डीजीसीएने (Directorate General of Civil Aviation) अचानकपणे लागू केलेले 'फ्लाइट ड्युटी टाइम लिमिटेशन' (FDTL) चे नवीन नियम असल्याचे जोशींनी सांगितले. हे नियम लागू करताना विमान कंपन्यांशी कोणतीही चर्चा करण्यात आली नाही, मनुष्यबळ उपलब्धतेचा अभ्यास केला नाही, संक्रमण कालावधी दिला नाही किंवा प्रवाशांच्या हिताचा विचार केला नाही. या अचानक नियमांमुळे इंडिगोला मोठ्या प्रमाणात क्रूची कमतरता जाणवली आणि शेकडो उड्डाणे रद्द झाली. परिस्थिती हाताबाहेर गेल्यावर डीजीसीएने घाईघाईने एक परिपत्रक मागे घेतले, परंतु तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते.

गेल्या आठवडाभरात लाखो प्रवाशांचे तिकिटांचे आर्थिक नुकसान झाले. अनेकांचे नियोजित कार्यक्रम, नोकरीच्या मुलाखती आणि आपत्कालीन प्रवास कोलमडले. कुटुंबीयांच्या भावनिक प्रसंगांना उपस्थित राहता न आल्याची वेदनाही अनेकांना सहन करावी लागली. हे सर्व केंद्र सरकारच्या धोरणात्मक चुकांमुळे घडले असल्याचे जोशी यांनी म्हटले आहे.

या परिस्थितीसाठी डीजीसीएतील निर्णय घेणारे अधिकारी, तसेच केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री हे थेट जबाबदार आहेत, असे मोहन जोशी यांनी म्हटले आहे. देशभरात गोंधळ माजवणाऱ्या आणि लाखो प्रवाशांना त्रास देणाऱ्या निर्णयांवर तत्काळ कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. तसेच, नियमावलीत बदल करताना विमान कंपन्यांशी चर्चा करावी, मनुष्यबळ विश्लेषण करावे, संक्रमण कालावधी द्यावा आणि प्रवाशांच्या हिताचे संरक्षण करावे, या गोष्टी केंद्र सरकारने पुढील काळात सुनिश्चित कराव्यात, अशी मागणीही जोशी यांनी केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०६ डिसेंबर २०२५


## जलनायक मधुकर धस यांच्या कार्याचा वसा निरंतर चालू राहील : विश्वनाथ (अण्णा) तोडकर




**बुलढाणा (प्रा. नागसेन कांबळे):** जिल्ह्यातील घाटंजी येथे महाराष्ट्र लोकविकास मंचच्या वतीने दिल्या गेलेल्या विदर्भीय अवॉर्ड कार्यक्रमांमध्ये ते बोलत होते. साला बादाप्रमाणे महाराष्ट्र लोकविकास मंचच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रातील विशेषता सामाजिक क्षेत्रातील गुणवंत, कर्तृत्ववान अशा कार्यकर्त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. यावर्षीचा कार्यक्रम कै. मधुकर धस यांच्या स्मृतीदिनानिमित्ताने ३ डिसेंबर २०२५ रोजी दिलासा संस्था घाटंजी जिल्हा यवतमाळ या ठिकाणी हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रमुख अतिथी म्हणून रमाकांत बापू, विजया धस, भूमिपुत्र वाघ,दत्ता पाटील, कोंढाळकर,यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पुरस्कार आयोजन सोहळ्याच्या संदर्भाने विजया धस सेक्रेटरी दिलासा संस्था यांनी महाराष्ट्रातून आलेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत केले. आणि कार्यक्रमाच्या रूपरेषेबद्दल त्यांनी विशेष मांडणी केली. भूमिपुत्र वाघ यांनी अवॉर्डची सुरुवात,अवॉर्डचे मूल्य आणि परंपरा या विषयावरती मांडणी केली. रमाकांत बापू यांनी अवॉर्ड संदर्भाने एकूणच पुरस्काराचे बदलत गेलेले स्वरूप या विषयावरती विचार व्यक्त केले विदर्भातल्या कार्यकर्त्यांना पाठबळ देणं,ऊर्जा देणं,आणि सामाजिक बदलाला पाठिंबा देणं ही आमची जबाबदारी आम्ही समजतो. या संदर्भात विचारपिठावरून त्यांनी आपले विचार मांडले.त्यानंतर प्रमुख अतिथी म्हणून दत्ता पाटील यांनी सामाजिक चळवळी शांत होताना सध्या पाहत आहोत.इतके असले तरीही,महाराष्ट्र लोकविकास मंचनी सामाजिक बदलाच्या चळवळीला पुरस्कृत केले आहे.त्यांच्यातील निरंतरता ही वाखानण्याजोगी आहे.याचा आम्हा विदर्भवाशीयांना अभिमान वाटतो. या पुरस्कार प्रदान सोहळ्यामध्ये खालील मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित केले. भव्य अशा समारंभात डॉ. मधुकर गुमळे, गुरुकुंज मोझरी यांना जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले, तर विजय बाबाराव कडू, चांदूर बाजार यांना विदर्भ रत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. त्याच बरोबर कै. प्रा. अविनाश शिर्के यवतमाळ यांना मरनोत्तर सामाजिक कार्य गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच पवनकुमार मिश्रा लाडेगांव, माधुरी खडसे डाखोरे राळेगाव, निरुपमा देशपांडे, मेळघाट, शीतल ठाकरे येरंडगाव, केशव गुरणुळे गडचिरोली, डॉ कविता बोरकर यवतमाळ, दुधराम ऊर्फ दिलीप बिसेन भंडारा, जिजा चांदेकर राठोड बुलढाणा यांना सामाजिक कार्य गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर पाणीदार संस्था म्हणून जमनालाल बजाज सेवा ट्रस्ट वर्धा यांना गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे संयोजन रंजीत बोबडे,विजया धस,कोमल धस,बंडू आंबेडकर,संगीता गायकवाड यांनी केले. या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते, पदाधिकारी विशेष उपस्थित होते. तर मधुकर धस,आणि विजया धस यांनी दत्तक घेतलेल्या मुली, नातवंडे,जावई असा मोठा परिवार सहभागी झाला होता. पुरस्कार वितरण सोहळ्याचे प्रास्ताविक विजया धस आणि भूमिपुत्र वाघ यांनी केले तर आभार बंडू आंबटकर यांनी मानले...






## भीमाला इमानदार किती जण राहिले या गाण्याचे सादरीकरण




**छत्रपती संभाजीनगर :** विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रत्येक क्षणाला गीतबद्ध करणारे गीतकार, शब्दबद्ध करणारे कवी, विचारबद्ध करणारे लेखक आणि वाणीबद्ध करणारे व्याख्याते या सर्वांनीच होईल तितक्या प्रयत्नाने आंबेडकरी विचार, तत्वज्ञान व चळवळ इथल्या जनमाणसात रुजविण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. आणि यशस्वीही झाला. या सगळ्या प्रबोधन आणि उदबोधनाच्या प्रक्रियेत अतुलनीय आणि अजरामर योगदान राहीलं ते आंबेडकरी गीतकारांच्या लेखणीचा प्राणवायू महाकवी वामनदादा कर्डकांच..

महाकवी वामनदादा कर्डकांनी मैफिलीची एक संहिता आणि समृद्ध अशी एक परंपरा आपल्याला दिली. आणि खऱ्या अर्थाने वामनपथानेच आंबेडकरी गीत संगीत सुजलाम व समृद्ध होतं आलं.याच वामनपथावरील पांथस्थ असणारे कालकथित विजयानंद जाधव, कालकथित बाबुराव जाधव, कालकथित प्रतापसिंग बोधडे यांनी वामनदादांच्या सहवासातून, त्यांच्या सोबत गायन व वादन करून वामन सहवासाची एक सुखद अशी अनुभूती घेतली. आणि स्वतःला वामन संस्कारांनी प्रगल्भ करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.वामनपरिघात केंद्रबिंदू म्हणून असणारे विजयानंद जाधव यांनी स्वतः अनेक गीते लिहिली. ज्या गीतांच गारुड आजही आपल्या सर्वांच्या काळजावर कायम आहे.त्यांचं, तुम्ही करारे कितीही हल्ला, लय मजबूत भीमाचा किल्ला हे गाणं वाजल्याशिवाय आपल्या जयंतीचा प्रारंभ होतं नाही.सत्तेसाठी तत्व भीमाचे पायी तुडवू नका,मातीमधल्या दगड खड्यांना उगाच चिडवू नका हे गाणं बाबासाहेबांच्या तत्वाशी एकनिष्ठ राहण्याचं भान आपल्याला देतं.विजयानंद जाधवांचं युगे येतील आणिक जातील हे गाणं ऐकल्यानंतर तर त्यांच्या प्रगल्भ अशा प्रतिभेचा प्रत्ययच आपल्याला येतो. भीमगीते, बुध्दगीते, भावगीते, गझल, लावणी अशा सगळ्या गीत प्रकारांना विजयानंद यांनी स्पर्श केला आणि तो सफलही झाला.त्यांचा वारसा त्यांचे पुतणे शाहीर मेघानंद जाधव आणि त्यांचे धाकटे चिरंजीव प्रा. अमोल जाधव यांनी सार्थपणे जपला आहे.मेघानंद हे आज आघाडीचे गायक म्हणून सर्वश्रुत आहेत. अमोलही आज अभिजात शास्त्रीय संगीतातलं एक मुर्धन्य व्यक्तिमत्व म्हणून लौकिकप्राप्त आहे. अमोल यांनी आपल्या वडिलांची असंख्य गीते संकलित करून ती शास्त्रोक्त चालीत बांधण्याचा खुप अवीट असा प्रयत्न केला आहे.

अशाच एका अवीट प्रयत्नातून शाहीर विजयानंद जाधव यांच्या सिद्धहस्त लेखणीतून साकारलेलं गाणं अमोलजींच्याच माधुर्यसंपन्न आवाजात आपण ऐकणार आहोत.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महपरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येला हे गाणं आपल्या सर्वांच्या हृदयी येत आहे.प्रख्यात संगीतकार आदरणीय मोहपात्रा यांच्या अतिशय तालमय अशा संगीत संयोजनातून संगीतबद्ध झालेलं हे गाणं आपल्या सर्वांना एक नवी चिंतन प्रणाली दिल्याशिवाय राहणार नाही.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत आपण किती प्रामाणिक आणि परखड आहोत याची मिमांसा करणारं हे गाणं आपण आवर्जून ऐकावं....मी आमच्या प्रिय मित्रवर्य आदरणीय अमोलजींना आणि त्यांच्या चमूला समस्त शिंदे परिवाराच्या वतीने वं डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेच्या वतीने कोटी कोटी शुभेच्छा देतो.हे गाणंही नेहमीप्रमाणे संपूर्ण महाराष्ट्राला आवडेल याच सदिच्छा.

आपला सांगितीक आस्वादक
व सन्मित्र
**शिंदे पंकज भास्करराव**
निवेदक वाणीक्रमांक
९५२९२७७२२९

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०६ डिसेंबर २०२५


## जि.प.प्रा. शाळा मालपुरच्या चिमुकल्यांचे संगीत महोत्सवात सुयश



**कन्नड (अरुण थोरात):** लोकनेते सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयातर्फे शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा. यासाठी कन्नड संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मालपुर केंद्र बहिरगाव येथील चिमुकल्यांनी सादर केलेल्या आदिवासी समूह नृत्य द्वितीय क्रमांक मिळाला आहे.

या गुणवंत विद्यार्थ्यांना आयपीएस अधिकारी अपराजिता अग्निहोत्री, प्राचार्य विजय भोसले, डॉ. मिलिंद पाटील या मान्यवरांच्या हस्ते तबला, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच शाळेचे मा. मुख्याध्यापक योगेश पवार यांनी विजयी नृत्य समुहास बक्षीस व मिठाई देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक शब्बीर शेख, भाऊसाहेब सोननीस, विकास साळुंके, गायत्री सोननीस यांचे मार्गदर्शन लाभले होते, तसेच केंद्रप्रमुख अनिता जालनापुरकर, केंद्रीय मुख्याध्यापक विजय पोतदार तसेच केंद्रांतर्गत शिक्षक बंधू -भगिनी यांचे सहकार्य लाभले.

गुणवंत विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल उपसरपंच रविंद्र बनकर, राजू बनकर, ग्रामपंचायत बहिरगाव -मालपुर शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष तथा सदस्य व ग्रामस्थ तथा पालक. यांच्या वतीने या गुणवंत विद्यार्थ्यांचा व मार्गदर्शक शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

## प्रकाश गाडेकर यांचा उबाठा शिवसेनेत प्रवेश



**कन्नड (अरुण थोरात):** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपजिल्हाध्यक्ष प्रकाश गाडेकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते शिवबंधन बांधून शिवसेनेत (उबाठा) प्रवेश केला.

यावेळी माजी खासदार विनायक राऊत, माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची उपस्थिती होती. प्रकाश गाडेकर हे कन्नड पंचायत समितीचे माजी उपसभापती असून त्यांनी कन्नड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष पदाची जबाबदारी पार पाडली आहे. त्यांच्या समवेत नादरपुर येथील संजय निकम, करंजखेडचे माजी सरपंच हय्यास सय्यद यांच्यासह करंजखेड जिल्हा परिषद गटातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शाखाप्रमुख व पदाधिकाऱ्यांनी शिवसेना (उबाठा) गटात जाहीर प्रवेश केला.

यावेळी तालुकाप्रमुख संजय मोटे, विभागप्रमुख अनिल चव्हाण, उपविभागप्रमुख रामेश्वर ताजने, बाबुराव सोनवणे, नाना येवले यांच्यासह कन्नड तालुक्याचे शिवसेनेचे पदाधिकारी, करंजखेड जिल्हा परिषद गटातील शिवसैनिक पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

## खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स मध्ये शिवाजी महाविद्यालयाच्या गौरव गोटे व निखिल वाघ यांनी कांस्यपदक पटकावले



**कन्नड (प्रतिनिधी ) :** कोटा, राजस्थान येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा तलवारबाजी संघ सहभागी झाला आहे. यामध्ये शिवाजी महाविद्यालयाचा आंतरराष्ट्रीय खेळाडू निखिल वाघ व राष्ट्रीय खेळाडू गौरव गोटे सहभागी झाले आहे. निखिल वाघेने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत सेबर वैयक्तिक प्रकारात कांस्यपदक पटकावले आहे. गौरव गोटे याने फाईल सांघिक प्रकारात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत कांस्यपदक पटकावले आहे.निखिल व गौरवणे दोन कांस्यपदके पटकावून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व शिवाजी महाविद्यालयाचे नाव लौकिक केले आहे.या खेळाडूंना शिवाजी महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ. उदय डोंगरे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. निखिल वाघ व गौरव गोटे यांचे श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री मानसिंह पवार, सचिव श्री चंद्रकांत देशमुख, कोषाध्यक्ष श्री बाबासाहेब मोहिते, प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, न्याक समन्वयक डॉ. विजय मातकर, प्रसिद्धीप्रमुख डॉ. शिवाजी हुसे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

# जाऊळका शिवारातील २९ लाखांच्या फसवणुकीतील फरार आरोपीस अटक...




**बुलढाणा (महेश मुंढे) :** याबाबत सविस्तर वृत्त असे की सिंदखेड राजा तालुक्यातील जवळका नगरमाळ येथील तब्बल 28 शेतकऱ्यांचा शेतमाल विकत घेऊन रु. 29,61,985/-ची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी दि. 23/11/2025 रोजी पोलीस ठाणे किनगाव राजा येथे फिर्यादी रामेश्वर कारभारी सांगळे राहणार जवळका व इतर 28 शेतकरी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आरोपी क्र. 1- प्रल्हाद अश्रुबा जायभाये आरोपी क्र. 2- पवन प्रल्हाद जायभाये दोघे रा लिंगा ता. सिंदखेड राजा यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता, त्यानंतर हे दोन्ही आरोपी फरार होते 18/11/2025 रोजी परत या पिता-पुत्रांनी एका शेतकऱ्यावर जातीय अत्याचार केला होता.

त्या प्रकरणी फिर्यादी प्रल्हाद नामदेव साळवे यांचे तक्रारीवरून आरोपी क्र. 1 व 2 यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता 22/11/2025 रोजी आरोपी क्र. 2 पवन प्रल्हाद जायभाये याला अटक करण्यात पोलिसांना यश आले. दि. 23/11/2025 पासून आरोपी क्र.1 प्रल्हाद अश्रुबा जायभाये याचा शोध सुरूच होता .

मा.ठाणेदार संजय मातोंडकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मोहन गीते , पोलीस कर्मचारी पोलीस ठाणे किनगाव राजा यांचे पथकास आज दि. 5/12/2025 ला यश मिळाले फरार आरोपी प्रल्हाद आश्रुबा जायभाये यास अटक करण्यात आली, या प्रकरणात मा. संजय मातोंडकर ठाणेदार किनगाव राजा त्यांच्या मार्गदर्शनाखाली केवळ तक्रार प्राप्त होताच तात्काळ तपास सुरू केला नाही तर तांत्रिक पुरावे, स्थानिक माहिती आणि गुप्त चौकशीच्या आधारे आरोपीचा मागवा घेतला .

यादरम्यान अनेक अडचणींचा सामना करत त्यांनी कारवाईत कोणतीही ढीलाई न ठेवता तत्परतेने, सातत्याने कारवाई पुढे चालू ठेवली शेतकऱ्यांनी दिलेल्या प्राथमिक माहिती सोबतच तपास पथकाने संबंधितांचे जबाब, समाज माध्यमांवरील हालचालिंवर बारकाईने लक्ष ठेवून आरोपी प्रल्हाद अश्रुबा जायभाये व पवन प्रल्हाद जायभाये यांना अटक केली, ही अटक म्हणजे फक्त एका गुन्ह्याचा उलगडा नसून भविष्यात अशा प्रकारे फसवणूक करणाऱ्यांना दिलेला कडक इशारा आहे. किनगाव राजा पोलिस दलाची ही जलद व प्रभावी कामगिरी पाहता ग्रामस्थांनीही समाधान व्यक्त केले असून तपास पथकाचे सर्वत्र कौतुक होत आहे व नागरिकांमध्ये पोलिसांबद्दल विश्वास अधिक दृढ झाला आहे.

# कथा-कथनामुळे सुसंस्कार होतात : प्राचार्य केशव भांगे...



**(शिरूर कासार) :** कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर(का.)जि. बीड येथे जिल्ह्याचे लोकप्रिय नेते तथा माजी मंत्री माननीय जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त,"कथाकथन स्पर्धा" घेण्यात आल्या.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी सांगितले की, "कथा-कथनामुळे विद्यार्थ्यांवरती सुसंस्कार होतात, रसिकांचे मनोरंजन,उदबोधन आणि प्रबोधन ही होते.कथेच्या माध्यमातून मूल्य विचार रुजविता येतात.विशेषतः कथा ही प्रेरणा, स्फूर्ती, बोध आणि ज्ञान देण्याचे महत्त्वाचे कार्य करते".असा मौलिक विचार त्यांनी भाषणातून व्यक्त केला.

या कथाकथन स्पर्धा दोन गटात घेण्यात आल्या."लहान गटात" इ.५ वी ते ७ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांचा सहभाग होता. तर "मोठ्या गटात" इ.८ वी ते १० वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

लहान गटातून,कु.हर्षदा चोरमले हिने 'प्रथम क्रमांक' पटकावला.व कु.गौरी उटे हिने 'द्वितीय क्रमांक' तर चिं. वरूण देवडे या विद्यार्थ्यांने 'तृतीय क्रमांक' मिळविला.तसेच "मोठ्या गटात" चि.शोएब शौकत आतार या विद्यार्थ्याने 'प्रथम क्रमांक' पटकावला व कु. आकांक्षा बडे हिने 'द्वितीय क्रमांक' तर कु. आराध्या गिते या विद्यार्थ्यीनीने 'तृतीय क्रमांक' मिळवून स्पर्धा जिंकण्याचा मान मिळविला.

याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे,विज्ञान प्रमुख प्रा.संजय काकडे,परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.आत्माराम झिंजुर्डे व सौ.अनिता लाटे मॅडम,क्रीडा विभाग प्रमुख रविंद्र बडे,स्पर्धा प्रमुख आर.एम.बडे व जयेंद्र निकम,प्रा.महादेव हांगे,प्रा. विनोद गलांडे तसेच विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०६ डिसेंबर २०२५


# जाहीर प्रगटन

जा.क्र.२०२५/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यू नोंद/सिआर-५०उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक ०७/११/२०२५ सर्व जनतेस जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार जयराम सखाराम उघडे रा. खोलापूर ता कन्नड जिल्हा छत्रपती संभाजीनगर **विरुद्ध** ग्रामपंचायत कार्यालय खोलापूर ता कन्नड जि छत्रपती संभाजी नगरजन्म-मृत्यू अधिनियम १९६९चे कलम १३ (३) अन्वये उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ/ ऍड. मार्फत/ स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगा चे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा मुलगा सार्थक जयराम उघडे चा जन्म दिनांक १२-०४-२०२१ रोजी रा खोलापूर ता कन्नड येथे जन्म झालेला आहे अर्जदार यांच्या मुलगा चा जन्म दिनांक १२-०४-२०२१ रोजी खोलापूर ता कन्नड जि छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झालेला आहे अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे सदर जाहीर प्रगटनाद्वारे तमाम जनतेस सुचित करण्यात येते की,अर्जदार यांचा मुलगा सार्थक जयराम उघडे यांचा जन्म दिनांक १२-०४-२०२१ रोजी रा खोलापूर ता कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/ आक्षेप /तक्रार असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक 24/12/2025 रोजी मा.न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणाचाही आक्षेप उजर/आक्षेप/तक्रार न आल्यास अर्जदारास दिनांक १२/०४/२०२१ रोजी रा खोलापूर ता कन्नड जि छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीनंतर आलेला उजर/आक्षेप/तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी करिता दिनांक ०७/११/२०२५ रोजी सदर जाहीर प्रकटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे

स्वाक्षरित
**(संतोष गोरड)**
उपविभागीय अधिकारी
कार्यालय कन्नड

# उजेडाची ज्योत

मी निघालो
आयुष्याची वाट तुडवीत
काळोख्या रात्रीच्या प्रदेशात
उजेडाची ज्योत घेऊन
सूर्याला भेटण्यास

वाटेवर आलीय वादळे
अडवण्या पावलांच्या गतीला
पडलोय ठोकर लागून अनेकदा

पण थांबलो नाही
चालत राहिलो
कासव गतीने का होईना
उजेड होईपर्यंत

अन् उजाडलं एकदाचं
सोनेरी किरणांनी केला वर्षाव
सुंदर हिरव्यागार धरतीवर

अन् प्रवास आनंददायी झाला



**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**

# बाबासाहेब तुमच्यामुळे

समतेचे वारे वाहू लागते
बाबासाहेब तुमच्यामुळे
ज्ञानगंगेत न्हावू लागले
बाबासाहेब तुमच्यामुळे

पिढ्यानपिढ्या रुजलेली
संपवलीस तुम्ही गुलामी
वेठबिगारीतून मुक्त झाले
बाबासाहेब तुमच्यामुळे

गावकुस जागे करुनी
पेटविल्यास संघर्षाच्या मशाली
अन्यायाची जाणीव झाली
बाबासाहेब तुमच्यामुळे

ज्ञानाच्या ज्योती पेटवूनी
नष्ट केलास अज्ञानरुपी
अंधकार
दीनदुबळे संघटीत झाले
बाबासाहेब तुमच्यामुळे

तुमच्या विशाल कार्याची
जगभर पताका फडफडे
संविधान जन्मास आले
बाबासाहेब तुमच्यामुळे



**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

# रामराज्यातील राजवृक्ष कोविदार वृक्षाचे सारोळा येथे रोपण



**कन्नड (अरुण थोरात):** राम राज्यातील राजवृक्ष असलेल्या कोविदार वृक्षाचे सारोळा येथील मठात विधिवत रोपण करण्यात आले आहे. नुकतेच अयोध्या येथे श्रीराम मंदिरावर ध्वजरोपण केलेल्या ध्वजावर या झाडा चे रूप चिन्ह आहे अंकित केले आहेत. त्यामुळे त्यास अध्यात्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या विशेष महत्व आहे.

अयोध्येतील श्रीराम मंदिरावर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते श्री राम राज्यातील "जय ध्वज" हा धर्म ध्वज आरोहीत केला. या धर्म ध्वजावर राम राज्यातील राज वृक्ष असलेला कोवीदार म्हणजेच रक्त कांचन, ओम व सूर्य ही रूप चिन्हे अंकित आहेत. कोवीदार वृक्ष व सदर ध्वज पराक्रम, समृद्धी, ऊर्जा, धर्म रक्षा याचे प्रतीक समजला जातो. कोविदार हा वृक्ष देशात वन्य अवस्थेत आढळतो.

सदर वृक्षाचे अयोध्येतील ध्वजरोपनाचे निमित्ताने भारतात सर्वप्रथम सिल्लोड तालुक्याचे आराध्य दैवत सारोळा येथील गहिनीनाथ महाराज देवस्थानाच्या प्रांगणात मठाधीपती बालयोगी जगन्नाथ गिरी महाराज व अभिनव प्रतिष्ठान चे अध्यक्ष तथा मा. नगराध्यक्ष किरण पवार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे चे गतीविधी सह कार्यवाह डॉ. संतोष पाटील यांच्या हस्ते दत्त जयंती चे दिवशी रोपण करण्यात आले.

यावेळी अन्वी, सारोळा, रहीमाबाद व पंच क्रोशीतील भाविक उपस्थित होते.

आज किरण पवार यांच्या मदतीने रोपण करण्यात आलेला हा वृक्ष रघु कुलाचा राज वृक्ष आहे. समृद्धी चे प्रतीक असलेला हा वृक्ष आम्ही सांगोपीत करू व लवकरच जय ध्वज ही आरोहीत करू -
**मठाधीपती जगन्नाथ गिरी महाराज, सारोळा**

एमजे न्यूज चॅनल


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०६ डिसेंबर २०२५

# डेमॉक्रसी : घराणेशाहीमुळे व्हेंटिलेटरवर अंतिम श्वास मोजणारी, तोडाफोडीने नासत चाललेली!

संसदीय लोकशाही व्यवस्थेत निवडणूक हा आत्मा असतो . आरक्षण अनियमितता आढळून आल्याने निवडणूकीच्या एक दिवस आधी आयोगाने निवडणूक स्थगित केली व मतदानाच्या दिवशी सकाळी पुढल्या दिवशी लागणारा निकाल 21 डिसेंबर ला लागेल असे जाहीर केले. खरंतर प्रचाराची रणधुमाळी शिघेला पोहचलेली. मतदारांसाठी मतदार उंबरठ्यावर पोहचण्या आधीच मतदान केंद्राचा दरवाजा बंद झाला, असे कधी घडले नाही.

निवडणूक आयोग सत्ताधारी पक्षाच्या सालदाराच्या भूमिकेत काम करत असल्याने हे अपेक्षित होते ,तरीही सर्व पक्षीय विरोधाचा टाहो फुटला. सत्तेसाठी रक्तपिपासू राजकीय पक्ष कायद्याची मोडतोड, नेत्यांची पळवापळवी, आघाडीत बिघाडी, युतीत फितुरी. सरकारातील मंत्र्यांनी एकमेकांना केलेला कमरेखालच्या भाषेतील पलटवार. हे चित्र महाराष्ट्राभर दिसले. प्रचारात जनतेच्या गरजा, प्रश्न, विकास व्हिजन कुठेच नव्हते. नेत्यांनी वारसदारांच्या राजकीय स्थापनेसाठी, सर्वच पक्षीय नेतृत्वाने घराणेशाहीचे उदात्तीकरण करीत आमदार, खासदार आणि दस्तुरखुद्द मंत्र्यांनी आपल्याच घरात सत्तेची चावी ठेवण्यासाठी नगराध्यक्षपद ठेवण्याचा चंग बांधला याही पुढे काहींनी मूलगा, पुतण्या, मुलगी यांनाही नगरसेवक पदाचे उमेदवार उभे केले.

प्रचारात तिजोरीची चावी, मालक, कोण? हा कलगीतुरा रंगला. मग मालक अन् चावी एकाच घरात कां नको? जळगाव जिल्ह्यात "लाडकी बायको" ही योजना राजकीय नेत्यांनी अग्रणी राबविली थेट सौभाग्यवतींना उमेदवार केले. हीच कां घटनाकारांना अपेक्षित लोकशाही? संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षाचे हेच कां फलित? झोपडी,वाडी,घर, बंगल्यात पैशांसाठी दबा धरून बसलेले मतदार! पैसे घेऊनच मतदान करणार ही गुलामी मानसिकता मतदारांच्या मनात बिंबविण्यात सर्व पक्ष यशस्वी ठरले.काल पार पडलेल्या निवडणुकीत अक्षरशः पैशांचा पाऊस पडला.भंडार्यासारखा लक्ष्मी प्रसाद वाटपाचा रात्रीचा खेळ, कार्यकर्ते, एकनिष्ठता, नेते, उमेदवार, विरोधकात कुठलाच नव्हता ताळमेळ.

या पार्श्वभूमीवर आचारसंहितेत पोलीस प्रशासनाने पांघरलेला भ्रष्ट बुरखा सर्वच अनागोंदी. मतपेटीतून राजा जन्मावा या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मताचा अनादर हीच कां त्यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त आदरांजली? अशा अनेक प्रश्नांचे उत्तर राजकीय विश्लेषक शोधतील कां? जनतेच्या डोळ्यातीत मतलबी,धूळफेकीची, तटस्थतेची झापडं कधी उघडतील?जगातील सर्वात बलाढ्य लोकशाही व्यवस्थेची ही ढासळत चाललेली मूल्यनिती रोखण्यासाठी संविधान अभ्यासक, हितचिंतक व समाजधुरीणांनी एकजूट होऊन "संविधान सन्मान" अभियान राबविण्याचा निर्धार करायला हवा .

संवैधानिक अधिकार , कर्तव्य व संविधानातील कलम आणि लोकशाही राज्यव्यवस्थेत मतदारांची भूमिका व अपरिहार्यता घराघरात पोहोचवली पाहिजे.निकोप, निरपेक्ष प्रजासत्ताकाचे मूल्यबीज पेरणारी बुद्धीजीवी हातांची वज्रमूठ उभी राहिली तरच हा देश एकसंघ राहणार आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ह्या मूल्यांचा समावेश डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीयांचे भले व्हावे हा एकमेव उद्देश व तळमळीतून केला होता आज हिंदू -मुस्लिम तेढ, जातीय भेदभाव, सांप्रदायिक संघर्ष, रक्तरंजीत नक्षलवाद, धर्मांध आतंकवाद जोडीला शासकीय प्रशासकीय भ्रष्टाचारात देश पिचला जातो आहे.

जनता त्रस्त झाली आहे बेरोजगारी, कर्जबाजारी, महागाई आरोग्य, शिक्षण, शेतकरी, श्रमिकांचे राजकीय शोषण, महिला अत्याचार , गरीबी या विषयावर कोणत्याही राजकीय पक्षाने ठोस उपाययोजना करण्यासाठी पाऊल उचलले नाही, दुसरीकडे सत्ता टिकवण्यासाठी, धर्म नावाचा अतिरेकी वापर केला जातो . धर्मांधतेची लस टोचून सामाजिक सलोखा व एकात्मता धोक्यात आणण्यासाठी सत्तेचा गैरवापर होताहे.धर्म ध्वजारोहणासारखा खर्चिक मेगा इव्हेंट, कुंभमेळ्यात साधू ग्राम उभारणी कारणे वृक्षतोड.पंधरा हजार कोटींची खैरात कशाला? दुसरीकडे शासकीय दवाखाने भग्नावशेष होत आहेत.उपचार साधनसामग्री,तज्ज्ञ डॉक्टर, औषधांचा अभाव . शासकीय महाविद्यालये, वसतिगृहाची दयनीय अवस्था.

यासाठी निधी नसतो.दोन हजार कोटींचा निधी नाही म्हणून हजारो शासकीय जि प मराठी शाळा बंद पाडण्याचा अट्टाहास म्हणजे सत्ता टिकवण्यासाठीची कुटनीती. यात सामान्य जनतेला कुठला न्याय? नागरीकांच्या समस्यांना सबका विकास नावाच्या मृगजळीन नार्यात जनतेला कुठेच स्थान नाही. मूठभर धनिकांची भाडवलशाही बळकट करण्यासाठी आख्खा देश वेठीस धरला जातोय.आजचे पुढारी जनता गृहीत धरून संस्थानिक, राजघराणे बळकट करतांना कुठलीच मूलाहिजा ठेवत नाहीत ही सत्ता टिकवण्यासाठीची, वर्चस्ववादी 'वाट' वहिवाट होण्याआधी उखडून टाकायलाच हवी.



**विद्रोही कवी साहेबराव मोरे**

चाळीसगाव

9404048601

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक न्याय आणि परिवर्तनाचे शिल्पकार

भारतीय इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी होऊन गेले आहेत की त्यांचे कार्य, विचार आणि जाणीवा एका कालखंडापुरत्या मर्यादित राहत नाहीत; त्या पिढ्यानपिढ्या समाजाला दिशा देतात, प्रेरणा देतात आणि सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला नव्या उंचीवर नेतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे असेच कालजयी व्यक्तिमत्त्व होय. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांचे स्मरण करणे म्हणजे केवळ एका नेत्याची आठवण नव्हे, तर न्याय, समता, स्वाभिमान आणि संघर्षाच्या मूल्यांना पुनश्च जागृत करणे होय. भारतातील दलित, वंचित, शोषित आणि उपेक्षित समाजाच्या उद्धारासाठी त्यांनी केलेले कार्य हे मानवाधिकार, सामाजिक लोकशाही आणि समतामूलक राष्ट्रनिर्मितीचे ध्वजवाहक होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व समजून घेण्यासाठी सुरुवातीला ज्या सामाजिक आणि ऐतिहासिक वास्तवात त्यांनी जीवनाची सुरुवात केली ते समजणे आवश्यक आहे. अस्पृश्यता ही जणू सामाजिक संस्थाच बनली होती. जन्म म्हणजे कर्म, आणि कर्म म्हणजे जात ही विचारधारा भारतीय समाजावर ठसवण्यात आली होती. परंतु या रूढीवाद, अवैज्ञानिकता आणि सामाजिक विषमतेचे निःशब्द बळी होण्याऐवजी त्यांनी त्याविरोधात बौद्धिक क्रांती उभारली. समाजाने दिलेली ओळख स्वीकारण्याऐवजी त्यांनी स्वतःची ओळख ज्ञान, संघर्ष आणि नेतृत्वातून घडवली. ते म्हणत असत की “माझे आयुष्य हे जन्माचे फळ नाही, तर माझ्या संघर्षाचे यश आहे.”त्यांनी शिक्षणाला मुक्तीचे माध्यम बनवले. शिक्षण मिळवणे हे जणू त्यांच्या जीवनातील सामाजिक अन्यायाविरुद्धचे पहिले युद्धच होते. समाजाने ‘अस्पृश्य’, ‘अयोग्य’ म्हणत जे दरवाजे बंद केले, ते त्यांनी मेहनतीने, बुद्धिमत्तेने आणि चिकाटीने उघडले. कोलंबिया विद्यापीठातून पीएच.डी., लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधील बॅरिस्टर, कायद्याची पदवी यामुळे ते फक्त भारतासाठीच नव्हे तर जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त विचारवंत ठरले. त्यांचे अध्ययन केवळ पुस्तकापुरते मर्यादित नव्हते; ते सामाजिक वास्तवाचे अभ्यासक होते. त्यांनी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, कायदा, राजकीय तत्त्वज्ञान, स्त्री-अधिकार, धर्म, इतिहास, मानवाधिकार आणि सामाजिक मानसशास्त्र अशा अनेक क्षेत्रांत अभ्यास केला.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्याचा पाया त्यांच्या व्यक्तीगत संघर्षातून उभा राहिला. जिथे एक ‘जात’ मनुष्याच्या अस्तित्वाचे मूल्य ठरवत होती, तिथे त्यांनी मानवतेचा, बंधुत्वाचा आणि समतेचा नवा सामाजिक अर्थ प्रस्तावित केला. महाडचा चवदार तळे सत्याग्रह हा फक्त पाण्याचा प्रश्न नव्हता तर तो मानवी प्रतिष्ठा आणि मूलभूत हक्कांचा प्रश्न होता. त्या आंदोलनात “हम पानी लेंगे, हक्क से लेंगे!” असे त्यांनी सांगत भेदभावग्रस्त समाजाला पहिल्यांदा स्वाभिमानाची ताकद दिली.नंतर नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहामध्ये त्यांनी धार्मिक क्षेत्रातील भेदभावाला थेट आव्हान दिले. “मनुष्य देवाच्या निर्मितीचा असतो, परंतु जातव्यवस्था मनुष्यांच्या बनावट नियमांची” ही घोषणा ज्या समाजात अस्पृश्यांना देवासमोर उभे राहण्याचा अधिकार नव्हता, त्या समाजात क्रांतिकारी होती. या आंदोलनांनी अस्पृश्यतेच्या भिंती फक्त हादरवल्या नाहीत, तर कोसळायला सुरुवात केली.त्यांच्या सामाजिक कार्याचा आणखी एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे महिलांसाठी दिलेले अधिकार. स्त्रियांच्या शिक्षणाचे, समतेचे आणि स्वातंत्र्याचे त्यांनी सर्वाधिक जोरदार समर्थन केले. हिंदू कोड बिलच्या माध्यमातून स्त्रियांना संपत्ती, विवाह, घटस्फोट आणि पुनर्विवाहाच्या अधिकारांची हमी देण्याचा त्यांचा प्रयत्न हा स्त्री-मुक्तीच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरला. तथापि, या सुधारणा मंजूर करण्यास विरोध झाल्याने त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा देताना स्पष्टपणे सांगितले की “जे समाज स्त्रीला समानता देत नाहीत, त्यांची प्रगती कधीही होऊ शकत नाही.”भारतीय संविधानाच्या रूपात त्यांनी देशाला नव्या सामाजिक व्यवस्थेचा आराखडा दिला. हे संविधान फक्त कायद्यांचा संच नाही तर ते भारतीय नागरिकांच्या स्वातंत्र्याचे, सन्मानाचे आणि मानवाधिकारांचे संरक्षण करणारे जिवंत दस्तऐवज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत की “राजकीय लोकशाही पुरेशी नाही; ती सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीवर आधारित असली पाहिजे.” यामध्येच भारतीय समाजक्रांतीचे मूलतत्त्व दडलेले होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थिक क्षेत्रातही मोठे योगदान दिले. भारतातील शेतकरी, कामगार यांचे प्रश्न त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून मांडले. जमीन सुधारणा, राष्ट्रीय जलनीती, औद्योगिकीकरण, बँकिंग क्षेत्र, वित्तीय व्यवस्थापन आणि कामगार कायदे या सर्व क्षेत्रांत त्यांनी मार्गदर्शक धोरणे मांडली. रिजर्व्ह बँकेच्या स्थापनेमागील त्यांची आर्थिक संकल्पना ही त्यांच्या अभ्यासाची खोली दर्शवणारी होती.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य फक्त समाजसुधारणेपुरते मर्यादित नव्हते तर ते मानवमुक्तीचे अभियान होते. त्यांनी धर्माच्या नावावर चालणाऱ्या अन्यायाला आव्हान दिले आणि अखेर १४ ऑक्टोबर १९५६ रोजी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्म स्विकारला. हा निर्णय संतापाचा नव्हता, तर आत्मसन्मानाचा आणि विवेकाधिष्ठित धर्माचा स्वीकार होता. ते म्हणाले होते की “मी हिंदू म्हणून जन्मलो, हे माझ्या हातात नव्हते; पण मी हिंदू म्हणून मरणार नाही, हे मी ठरवले.” आणि या निर्णयातून त्यांनी भारतीय इतिहासाला नव्याने ‘बौद्धयुग’ दिले.आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतीदिनाच्या निमित्ताने आपण त्यांच्या विचारांकडे पाहतो तेव्हा एक प्रश्न उभा राहतो की त्यांचे स्वप्न कितपत पूर्ण झाले? संविधानाचा आदर करणे, समानता स्वीकारणे, जातभेद नष्ट करणे, मानवतेच्या मूल्यांचे पालन करणे ही मूल्ये आज अजूनही संघर्षात आहेत. जातीय हिंसा, सामाजिक विषमता, आर्थिक असमानता, महिलांवरील अत्याचार, धार्मिक ध्रुवीकरण आणि शिक्षणातला वर्गविचार आजही अस्तित्वात आहे. म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक चळवळ संपलेली नाही तर ती अजूनही चालूच आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मंत्र “शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा” हा मंत्र केवळ घोषवाक्य नसून सामाजिक परिवर्तनाचे क्रियासूत्र आहे. शिक्षण हे व्यक्तीला विचार देतं; संघटना व्यक्तीला शक्ती देते; आणि संघर्ष व्यक्तीला इतिहास बदलण्याची ताकद देतो. हा संघर्ष द्वेषाचा नाही; तर न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठेच्या स्थापनेसाठी आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची महत्ता फक्त भारतीय समाजापुरती मर्यादित नाही तर जगातील सामाजिक न्यायाच्या लढ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मानवसंस्कृतीच्या इतिहासात अभिमानाने घेतले जाते. ते फक्त संविधानकार नाहीत; ते मानवतेचे अभियंते आहेत. ते फक्त नेता नाहीत; ते विचारयुगाचे निर्माता आहेत. ते फक्त इतिहासाचा भाग नाहीत; तर ते भविष्याचा मार्ग आहेत.आज ६ डिसेंबर रोजी असणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्मृतीदिन हा केवळ अभिवादनाचा क्षण नसून जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. त्यांच्या कार्याचे, तत्त्वज्ञानाचे, सामाजिक उभारणीच्या दृष्टिकोनाचे अनुसरण करणे हीच खरी कृतज्ञता आहे. त्यांचा विचार जिवंत राहिला, न्यायव्यवस्था समतामूलक राहिली, समाजाने मनुष्याला मनुष्य म्हणून स्वीकारले तरच त्यांचे स्वप्न पूर्ण होईल. आपण सर्वांनी एकत्र येऊन केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला नव्हे, तर त्यांच्या विचारांना वंदन करणे ही काळाची गरज आहे.अशा या ज्ञानाच्या प्रतीकला विनम्र अभिवादन.....



**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

मो. ९९६०१०३५८२,

ईमेल - bagate.rajendra5@gmail.com